# कार्यालय

## ग्राम पंचायत खनोरा

### पंचायत समिती रामटेक जिल्हा परिषद नागपूर

### ई – निविदा सुचना क्रमांक 1 - 2026-2027

गटग्रामपंचायत खनोरा येथे विविध प्रकारचा कामाकारीता सर्व योजना अंतर्गत बांधकाम साहित्य तसेच विविध प्रकारचा कामाकरीता विद्युत साहित्य आणि पाणी पुरवठा साहित्य खरेदी करण्याकरिता वार्षिक ई-निविदा मागविण्यात करीता जिल्हा परिषद वेबसाईटवर www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | तपशील | दरपत्रक विक्रीचा दिनांक | दरपत्रक स्वीकृतीचा दिनांक | दरपत्रक उघडण्याचा दिनांक | निविदा फी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सन 2026-2027 मध्ये गटग्रामपंचायत खनोरा येथे विविध प्रकारचा कामाकारीता सर्व योजना अंतर्गत बांधकामासाठी साहित्य खरेदी करण्याकरिता वार्षिक ई-निविदा मागविण्यात येत आहे. | दि. 27/05/2026 सकाळी 11.00 वाजतापासून | दि. 02/06/2026 दुपारी 02.00 वा. पर्यत | दि. 03/06/2026 दुपारी 02.00 वा. नंतर | 500/- |
| 2 | सन 2026-2027 मध्ये गटग्रामपंचायत खनोरा येथे विविध प्रकारचा कामाकरीता विद्युत साहित्य आणि पाणी पुरवठा साहित्य खरेदी करण्याकरिता वार्षिक ई-निविदा मागविण्यात येत आहे. | दि. 27/05/2026 सकाळी 11.00 वाजतापासून | दि. 02/06/2026 दुपारी 02.00 वा. पर्यत | दि. 03/06/2026 दुपारी 02.00 वा. नंतर | 500/- |

**निवेदेतील अटी व शर्ती जि. प. नागपूर च्या www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.**

**निविदा सादर करण्यासाठी डिजीटल सही अनिवार्य आहे.**

टीप: सदर निविदा तसेच या निवेदेतील अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असल्यामुळे या निवेदेची जाहिरात वर्तमान पत्रात द्यायची कि नाही या निर्णयासंबधी चे सर्व अधिकार ग्रामपंचायत स्वतः कडे राखून ठेवत आहे . जर या निवेदेची जाहिरात न देता फक्त Online निविदा प्रसिद्ध करण्यात आल्यास कोणताही पुरवठा धारक किवा निविदा भरणार यावर आक्षेप घेणार नाही किवा त्यांचा आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही.

सचिव/सरपंच सरपंच

ग्रा.प. खनोरा ग्रामपंचायत खनोरा

पंचायत समिती, रामटेक

# कार्यालय

## ग्राम पंचायत खनोरा

## पंचायत समिती रामटेक जिल्हा परिषद नागपूर

याद्वारे सर्वं अधिकृत साहित्य पुरवठादारास सूचि त करण्यात येते की , गटग्रामपंचायत खनोरा येथे विविध प्रकारचा कामाकारीता बांधकामसाहित्य आणि विविध प्रकारचा कामाकरीता विद्युत साहित्य आणि पाणी पुरवठा साहित्य खरेदी करण्याकरिता वार्षिक ई-निविदा मागविण्यात येत आहे. करीता **आवश्यकतेनुसार** साहित्य पुरवठा करण्याकरिता ई-निविदा मागविण्यात येत आहे.

तरी इच्छुक पुरवठादारांनी आपले दर सोबतच्या दरपत्रकामध्ये ग्राम पंचायतखनोराजिल्हा परिषद नागपूर च्या वेबसाईट निविदा सादर कराव्या. उशिरा आलेल्या निविदेच्या विचार करण्यात येणार नाही

# अटी व शर्ती

१) सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई – निविदा द्वारा ऑनलाईन पद्धतीने संगणकीय आज्ञावलीत होईल. सदर निविदा, नोटीस, प्रसिद्धी, सुचना, शुद्धिपत्रके इत्यादीची माहिती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**सदर कामाच्या निविदा बाबत खालील बाबी आवश्यक राहतील.**

i) पुरवठादार नोंदणी प्रमाणपत्र (फोटो), जी.एस.टी./व्हॅट-टीन प्रमाणपत्र, दुकानाचे बिल व प्राप्ती कर पॅन कार्ड स्कॅन कॉपी अपलोड (Upload) करावी लागेल.

ii) निविदा प्रमाणपत्रातील सविस्तर निविदा नोटीस मधील सर्व अटी व शर्ती पुरवठादारास बंधनकारक राहतील.

iii) उपरोक्त कागदपत्रे सादर करण्यास कोणताही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.

iv) शासनाचा दरसूची (C.S.R.) च्या दरापेक्षा कमी किंवा जास्त दर असल्यास ई-निविदा रद्द करण्यात येईल.

२) ऑनलाईन पद्धतीने सादर केलेला लिफाफा क्र. १ (तांत्रिक लिफाफा) www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर कार्यालयात उघडण्यात येईल.

३) मंजूर निविदा धारकाकडून विहित सुरक्षा अनामत रक्कम ही कामाचा करारनामा करते वेळी ग्राम पंचायतच्या नावे ग्रा. प. खनोरायेथे देय असलेल्या धनाकर्षाच्या स्वरुपात राष्ट्रीय बँकेचा स्वीकारल्या जाईल.

४) निविदा संदर्भात कोणत्याही मार्गदर्शक सुचना शुद्धिपत्रक अथवा इतर माहिती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

५) सदर कामाच्या तीन योग्य निविदा प्राप्त झाल्याशिवाय निविदा उघडण्यात येणार नाही. मात्र तिसऱ्यांदा एकच निविदा प्राप्त झाल्यास त्या निविदा धारकास निविदा देण्यात येईल किंवा पूर्ण ई-निविदा रद्द करून त्यात फेरबदल करण्याचा पूर्ण अधिकार ग्रामपंचायत स्वतः कडे राखून ठेवत आहे, याची नोंद घ्यावी.

६) ई-निविदा उघडल्यापासून 31/03/2027 पर्यंत ग्राह्य राहतील.

७) पुरवठाधारकातर्फे कोणत्याही अटी व शर्ती घालून सादर केलेल्या ई-निविदा स्वीकारल्या जाणार नाही.

८) निविदा मंजूर झाल्यास रु. 500/- च्या स्टँप पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.

९) ई-निविदा सोबत सत्यप्रती फक्त राजपत्रित अधिका-याकडून साक्षांकित केलेल्या असाव्यात.

१०) ई-निविदा सोबत (ITR) आयकर रिटर्न जोडावे. (मागील ३ वर्षाचे)

११) अनामत रक्कम 5000/- निविदा मंजूर झाल्यानंतर 7 दिवसाचा आत अनामत रक्कम म्हणुन जमा करावी लागेल. अन्यथा दुस-या क्रमांकाचा निविदाधारकाला संधी देऊन त्यांच्याकडून साहित्य खरेदी करण्यात येईल.

१२) साहित्याचे मूल्य हे रॉयल्टी शुक्लासह आणि जी.एस.टी सह असावे. आणि साहित्याचे पेमेंट करते वेळी रॉयल्टी भरल्याच्या पावत्या सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा साहित्याचे पेमेंट हे रॉयल्टी कपात करून देण्यात येईल याची नोंद घ्यावी. (बिल सादर करताना साहित्याचे मूल्य आणि GST चे दर वेगवेगळे सादर करावे.)

१३) निविदा फॉर्म किंमत सामान्य फंड ग्रामपंचायत खनोरा चा बँक ऑफ इंडिया शाखा हिवरा-बाजार या राष्ट्रीय बँकेत जमा करावे. (खाते क्रमांक– 87381010003401 IFSC Code – BKID0008738) व रक्कम जमा केल्याची पावती (Receipt) जोडावी. (वेगवेगळ्या ई-निविदेला वेगवेगळी पावती जोडावी. एकच पावती आढळल्यास त्या निविदा धारकाची निविदा रद्द करण्यात येईल.)

१४) वरील निविदा फी हि Net Banking व Intenet Banking किंवा कोणत्याही Online पद्धतीने भरल्यास काहीही हरकत राहणार नाही. फक्त ती रक्कम ग्रा.प. चा खात्यात जमा झाली पाहिजे. निविदा फी ग्रा.प. खात्यात जमा न झाल्यास सदर निविदा रद्द करण्याचा पूर्ण अधिकार ग्रा.प. ला राहील.

१५) रक्कम जमा केल्याची पावती (Receipt) निविदा उघडण्याचा दिनांकाचा १ दिवसाआधी ग्रा. प. कार्यालयात जमा करावी. रक्कम जमा केल्याची पावती विहित वेळेस ग्रा. प. कार्यालयात जमा न केल्यास त्यांची निविदा पात्र/अपात्र करण्याचा अधिकार ग्रा.प. ला राहील याची निविदाधारकांनी नोंद घ्यावी

१६) साहित्याची रक्कम मूल्यांकनानुसार अनुदान प्राप्त झाल्यानंतर देण्यात येईल याची नोंद घ्यावी

१७) बिल जि.एस.टी. पेडेट असने आवश्यक आहे. (जि.एस.टी. प्रमाणपत्र सोबत जोडावे. अन्यथा उक्त निविदा रद्द करण्यात येईल.)

१८) मंजूर निविदाधारकास साहित्याचा पुरवठा निविदा ओपन झाल्यानंतर पुरवठा आदेशदिल्यापासून ७ दिवसाचा आत करावे लागेल अन्यथा दुस-या क्रमांकाचा निविदाधारकाकडून साहित्याचा पुरवठा करण्यात येईल

१९) सदर ई-निविदेत L1 पुरवठा धारकाने साहित्य पुरवठा न केल्यास L2 कडून आणि L2 ने पुरवठा न केल्यास L3 कडून साहित्य पुरवठा करुन घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२०) पुरवठाधारकास रॉयल्टी, जि.एस.टी., अनामत, सेस, व ईतर कपाती शासनाच्या नियमानुसार बंधनकारक आहे

२१) पुरवठाधारकाचे कागदपत्रे चुकीचे आढळल्यास निविदा रद्द करण्यात येईल

२२) कोणत्याही परिस्थितीत साहित्याचे दरात वाढ मिळणार नाही

२३) साहित्याचे दर हे स्थानिक दराशी सुसंगत असावे.

२४) एकदा मंजूर केलेली निविदा पुरवठा धारकास मागे घेणे अथवा रद्द करता येणार नाही तसे केल्यास ग्रामपंचायत चे काळ्या यादीत सदर पुरवठाधारकास समाविष्ट करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी

२५) [redacted]

२६) कोणतेही कारण न दर्शवता संपूर्ण निविदा रद्द करण्याचा अधिकार ग्रा.प. ला राहील.

२७) ई-निविदा Online प्रकशित करतांना किवा उघडतांना काही चुका झाल्यास व त्यातून काही वाद निर्माण झाल्यास ग्रा.प. चा निर्णय अंतिम राहील. व तो निर्णय सर्व निविदा धारकांना मंजूर असेल. त्यावर कोणत्याही निविदा धारकाचे आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही.

२८) ग्रा.प. ने मागणी केलेले साहित्य हे ग्रा.प. ला पोहचता असावे. दिलेल्या वेळेत निविदा धारकाने साहित्य ग्रा.प. ला पोहचता न केल्यास त्याची निविदा रद्द करण्याचा अधिकार ग्रा.प. ला राहील.

टीप: सदर निविदा तसेच या निवेदेतील अटी व शर्ती या ग्रा.प. ने ठरविलेल्या आहे. या निवेदेतील अटी व शर्ती संबधी चे सर्व अधिकार ग्रामपंचायत स्वतः कडे राखून ठेवत आहे. निवेदेतील अटी व शर्ती बाबत कोणताही कंत्राटदार/पुरवठा धारक किवा निविदा भरणार यावर आक्षेप घेणार नाही किवा त्यांचा आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही.

Bhund
सरपंच
ग्रामपंचायत खनोरा
पंचायत समिती, रामटेक

सचिव/सरपंच
ग्रा.प. खनोरा

Signature Not Verified
Digitally signed by Sarala Tulashiram Khandate
Date: 2026.05.27 09:15:30 IST
Location: Maharashtra-MH